संस्थेंस आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला देण्याचे काम ही अभिकरणे करतील. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे नियोजन व आवश्यक तेथे राज्य तांत्रिक अभिकरणांमार्फत होत असलेल्या कामांचा समन्वय संचालक, महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे ठेवतील.

१२. तसेच विभागीय व स्थानिक स्तरावर या दोन्ही तांत्रिक अभिकरणांच्या कार्यालयांशी समन्वय ठेवण्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थांचे स्थानिक अधिकारी आवश्यक ती कार्यवाही करतील.

१३. महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेबाबतच्या योजनांच्या अनुदानांचे व्यवस्थापन करेल. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत अनुदान मिळविण्याकरिता ही संस्था राष्ट्रीय ग्रामीण प्रकल्प व सहाय्य तसेच संपूर्ण स्वच्छता अभियानासाठी स्वतंत्र बँक खाती उघडेल. अशी सर्व खाती Core Banking सुविधा असणा-या फक्त राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडली जातील.

१४. महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर, सध्या कार्यरत असलेल्या सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (RSPMU), संवाद क्षमता व विकास कक्ष (CCDU), आपलं पाणी (KFW) व भारत निर्माण कक्ष हे सर्व कक्ष या नोंदणीकृत संस्थेत विलिन करण्यात येतील. विलिनीकरणाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे असेल.

अ) भारत निर्माण कक्ष, संवाद क्षमता व विकास कक्ष, स्वजलधारा कक्ष यांचे विलिनीकरण तात्काळ करण्यात येईल.

ब) जलस्वराज्य प्रकल्प कक्षातील (RSPMU) कार्यक्षम अधिकारी / कर्मचारी प्रकल्पाची मुदत संपल्यावर म्हणजेच सप्टेंबर, २००९ नंतर आवश्यकतेनुसार विलिन करण्यात येतील.


क) आपलं पाणी कक्षातील (KFW) अधिकारी / कर्मचारी प्रकल्पाची मुदत संपल्यावर म्हणजेच डिसेंबर, २००९ नंतर आवश्यकतेनुसार विलिन करण्यात येतील.

१५. ही संस्था मंत्री मंडळाच्या मान्यतेने संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली नोंदविण्यात येईल.

१६. या संस्थेचे कार्यालय सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे असेल.

१७. संस्थेच्या नोंदणीबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

# राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेची प्रस्तावित संरचना



## राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संघटनेच्या नियंत्रणाखालील विभागीय व जिल्हा स्तरावरील यंत्रणा

राज्यस्तरावरील पाणी पुरवठा शाखेच्या नियंत्रणाखाली

**विभागीय पाणी पुरवठा कक्ष**

अधिक्षक अभियंता उप **अभियंता (१), शाखा अभियंता (२), उप लेखापाल, लिपीक टंकलेखक, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वाहन चालक, शिपाई**

| जिल्हा स्तर | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग.** | | |
| **तांत्रिक शाखा**<br>उप अभियंता<br>शाखा अभियंता (२)<br>कनिष्ठ अभियंता (२) | **सनियंत्रण शाखा**<br>उप अभियंता<br>शाखा अभियंता (२)<br>कनिष्ठ अभियंता (२) | **देखभाल व दुरुस्ती शाखा**<br>उप अभियंता<br>शाखा अभियंता (२)<br>कनिष्ठ अभियंता (२) |
| सहायक लेखा अधिकारी यांचेसह सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला कर्मचारी वर्ग. | | |
| **कंत्राटी अभियंते (जिल्ह्याच्या गरजेनुसार)** या अभियंत्यांना तालुक्यातील कामांच्या भारानुसार तालुका निहाय पंचायत समिती स्तरावर उप अभियंता यांचे नियंत्रणाखाली ठेवता येईल. (?) | | |

| तालुका स्तर | | |
|---|---|---|
| **उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग** | | |
| **तांत्रिक शाखा**<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता (१) | **सनियंत्रण शाखा**<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता (१) | **सनियंत्रण शाखा**<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता (१) |
| सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला कर्मचारी वर्ग | | |
| **कंत्राटी अभियंते (जिल्ह्याच्या गरजेनुसार)** आवश्यकतेनुसार (?) | | |

राज्यस्तरावरील स्वच्छता शाखेच्या नियंत्रणाखाली

**विभागीय स्वच्छता कक्ष** उप **आयुक्त विकास** चालू पद्धतीनुसार

जिल्हा स्तर

**जिल्हा समन्वयक (उप मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर समकक्ष अधिकारी**

संवाद तज्ञ (कंत्राटी पद्धतीने)
**मानव संसाधन तज्ञ** (कंत्राटी पद्धतीने)
शालेय स्वच्छता व आरोग्य शिक्षण तज्ञ (कंत्राटी पद्धतीने)
**सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ** (कंत्राटी पद्धतीने)
कक्ष अधिकारी (प्रतिनियुक्तीने पूर्ण वेळ)
**लेखा अधिकारी** (प्रतिनियुक्तीने पूर्ण वेळ)
**शालेय शिक्षण व आरोग्य समन्वयक** (२)
**डाटा एन्ट्री ऑपरेटर** (२)
**शिपाई**

तालुका स्तर

तालुका समन्वयक
विस्तार अधिकारी शालेय
शिक्षण व आरोग्य शिक्षण समन्वयक डाटा एन्ट्री
ऑपरेटर

---

एच-१५१९-४अ०

१८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२५१७४४५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित कुमार जैन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम
ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या
अंमलबजावणीसाठी कंत्राटी अभियंत्यांच्या
सेवा घेण्याबाबत ...

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ०९ सप्टेंबर, २००९

वाचाः १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु- १००३/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ०३ सप्टेंबर, २००१
२) शासन परिपत्रक , पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु- १००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दिनांक २३ मार्च, २००२
३) शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु- १००५/प्र.क्र.१३/पापु-०७, दिनांक १८ फेब्रुवारी, २००५
४) शासन पत्र क्र.आरएसपीएमयु /टीए/टीएसपी /पापु-११, दि.०१ जून, २००४
५) शासन पत्र क्र.तांस-२००६/सर्वसा/प्र.क्र.१३६/पापु ११, दि.०६ जून, २००६
६) शासन पत्र क्र.जलस्व-२००६/सर्वसा/प्र.क्र.१३६/पापु ११, दि. १० नोव्हेंबर, २००६
७) शासन निर्णय, पापुवस्ववि क्र.ग्रापाधो-११०९/ प्र.क्र.११५/पापु-०७, दि.०१ ऑगस्ट,२००९.

**प्रस्तावना :**

सन २००० पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम मागणी आधारीत समूह सहभागाच्या लोकाभिमुख धोरणानुसार राबविण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये या धोरणाचे अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये येणा-या अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. यामध्ये गावामध्ये नवीन नळ पाणी पुरवठा योजना घेण्याचे निश्चित झाल्यावर ग्राम आरोग्य, पोषण व पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने ग्रामसभेच्या मान्यतेने योजनेची प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी तसेच योजनेचे तांत्रिक पर्यवेक्षण करण्यासाठी तांत्रिक सेवा पुरवठादार (TSP) संस्थेची निवड करावयाची आहे.

F:\२००९\GR०९-११\GR ९१५ ०९ GR ११०८०९.doc
रोटॅ/एच-१६३३[ १२००-९-२००९ ]-१

३. संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये जिल्हास्तरावर सक्षम तांत्रिक सेवा पुरवठादारांचे पॅनल तयार करणे इत्यादीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. या पॅनलमधून तांत्रिक सेवा पुरवठादारांची निवड करण्याचा निर्णय संबंधित ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने ग्रामसभेच्या मान्यतेने घ्यावयाचा आहे.

४. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत घ्यावयाच्या नवीन नळ पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक सेवा पुरवठादार संस्थांचा अनुभव व क्षमता, नोंदणीसाठीचे नियम तसेच योजनेची किंमत जितकी जास्त, तितक्या प्रमाणात तांत्रिक सेवा पुरवठादारांचे शुल्क व प्रशासकीय खर्चाची रक्कम जास्त यामुळे होणा-या अनियमितता दूर करण्यासाठी संदर्भ क्र.४, ५ व ६ येथील शासन पत्रान्वये विविध सूचना देण्यात आलेल्या आहेत.

५. भारत निर्माण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीदरम्यान तांत्रिक सेवा पुरवठादारांच्या कार्यपध्दतीविषयी खालील बाबी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत.

- जिल्ह्यातील एकाच तांत्रिक सेवा पुरवठादाराकडे जास्त योजनांची कामे दिली गेली आहेत.
- एकाचवेळी अनेक कामे हाती घेतल्याने, कामांचे योग्य पर्यवेक्षण होत नाही, तसेच कामांचा दर्जाही राखला जात नाही.
- अंदाज, आराखडे व तांत्रिक पर्यवेक्षण शुल्काच्या ७ टक्के रकमेमुळे जास्तीत जास्त मोठ्या रकमेच्या योजना तयार करणे व जास्तीत योजनांची कामे मिळविणे याकडे तांत्रिक सेवा पुरवठादारांचा कल वाढत आहे.

यामुळे तांत्रिक सेवा पुरवठादारांच्या कार्यपद्धतीबाबत पुर्नविचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

६. केंद्र शासनाच्या ग्रामीण पाणी पुरवठा विषयक नवीन मार्गदर्शक सूचनांचे अनुषंगाने दि.१३ व १४ मे,२००९ रोजी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली यशदा, पुणे येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्येदेखील या विषयावर तपशीलवार चर्चा झाली. त्यावेळी तांत्रिक सेवा पुरवठादारांऐवजी जिल्हा परिषद स्तरावर कंत्राटी अभियंते घेण्यात यावेत, यामुळे अवास्तव किंमतीच्या योजना तयार करण्यास काही प्रमाणात प्रतिबंध होईल, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागास मदत होईल व शासकीय निधीचा अपव्यय देखील होणार नाही, अशी भूमिका अनेक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मांडली.

७. केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये तसेच सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत कनिष्ठ अभियंत्यांची पदे कंत्राटी पद्धतीने भरली जातात. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये भरावयाच्या पदांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. तर, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या निकषानुसार पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे. मात्र प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत कनिष्ठ अभियंत्यांची पदे एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पध्दतीने भरली जातात. तर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठीची पदे प्रतिनियुक्तीने, अल्प कालावधीच्या (सहा महिने) करार पद्धतीने किंवा सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून भरली जातात.

८. उपरोक्त परिस्थिती विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तांत्रिक सेवा पुरवठादाराऐवजी जिल्हा परिषद स्तरावर जिल्ह्यातील कामांच्या प्रमाणात करार पध्दतीने कनिष्ठ अभियंते नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत महाजल (किमान गरजा कार्यक्रम), राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (NRDWP) सर्व बाह्य अर्थसहाय्यीत प्रकल्पांतर्गत (जलस्वराज्य प्रकल्पासह) राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी यापुढे तांत्रिक सेवा पुरवठादाराऐवजी करार पध्दतीने कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांची सेवा घेण्यास शासन मान्यता देत आहे.

२. वरील कार्यपद्धतीचा स्विकार केल्याने संदर्भ क्र.३ येथील दि.१८ फेब्रुवारी, २००५ मधील शासन परिपत्रकातील तांत्रिक सेवा पुरवठादारांशी संबंधित तरतूदी अधिक्रमीत करण्यात येत आहेत. त्यामुळे गावात पिण्याच्या पाणी पुरवठ्याची व्यवस्था घेण्याचे निश्चित झाल्यावर, ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधून योजनेचे अंदाज पत्रके व आराखडे तयार करणे तसेच योजनेचे तांत्रिक पर्यवेक्षण यासाठी जिल्हा परिषदांकडे विचारणा करावी. जिल्हा परिषदेकडील नियमित अभियंता किंवा जिल्हा सहाय्य कक्षाकडील सूचीवर असलेल्या कंत्राटी अभियंत्यांच्या सेवा संबंधित ग्रामपंचायतींसाठी उपलब्ध करून देत असल्याबाबतचे लेखी पत्र कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने संबंधित ग्रामपंचायतीला द्यावे. कार्यकारी अभियंत्यांच्या तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रणाखाली अंदाज पत्रके व आराखडे बनविण्यापासून योजना यशस्वीरित्या कार्यान्वित करेपर्यंतची योजनेची जबाबदारी या कनिष्ठ अभियंता / अभियंते यांची राहील.

३. सर्व जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागांनी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस जिल्ह्यांमध्ये चालू असलेल्या व नव्याने घ्यावयाच्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचा वार्षिक कृती आराखडा विचारात घेऊन कामांच्या व्याप्तीच्या प्रमाणात नियमित अभियंत्यांना निकषाप्रमाणे कामे दिल्यानंतर, कामे चालू असलेल्या ५ ग्रामपंचायतींकरिता किंवा रु.२.०० कोटीपर्यंतच्या (यापैकी जे जास्त असेल) कामांसाठी १ कनिष्ठ अभियंत्याची सेवा जिल्हा सहाय्य कक्षामार्फत करार पध्दतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी घ्यावी. सदर कनिष्ठ अभियंता प्रस्तावित जिल्हा सहाय्य कक्षाचा (District support unit) घटक असेल.

४. या कनिष्ठ अभियंत्यांची शैक्षणिक अर्हता व त्यानुसार त्यांना द्यावयाचे एकत्रित ठोक मानधन पुढीलप्रमाणे असेल :

| कनिष्ठ अभियंता | मासिक एकत्रित ठोक मानधन |
|---|---|
| अ) स्थापत्य अभियांत्रिकी पदविका धारक | रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) |
| ब) स्थापत्य अभियांत्रिकी पदवी धारक | रु.१२,०००/- (रुपये बारा हजार फक्त) |

वरील मासिक एकत्रित ठोक मानधनासह प्रत्यक्ष केलेल्या प्रवासाकरिता (या अभियंत्यांनी स्वतःचे वाहन वापरले तरीही) नियमानुसार कनिष्ठ अभियंता या पदासाठीचा प्रवास व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय ठरेल. त्याचप्रमाणे या अभियंत्यांना भ्रमण दूरध्वनी (Mobile Phone) अशा प्रकारच्या संपर्कासाठी किंवा इंटरनेट वापर या करिता मासिक रु.१०००/- (रु.एक हजार फक्त) इतकी रक्कम देण्यात येईल.

५. या कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांची सेवा एक वर्षासाठी करार पद्धतीने घेण्यात येईल. त्यांना या सेवेच्या आधारावर नियमित नियुक्तीसाठीचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कंत्राटी अभियंत्यांची सेवा उपलब्ध करून घेताना त्यांना द्यावयाचे पत्र / करारनामा यामध्ये याबाबीचा कटाक्षाने उल्लेख करण्यात यावा. या एक वर्षाच्या कालावधीत संबंधित कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याची वर्तणूक, कामाप्रती तत्परता, नियमितता व संबंधित ग्रामपंचायतीचे अभिप्राय विचारात घेऊन त्याची सेवा पुढील एक वर्षासाठी पुन्हा कंत्राटावर घेता येईल.

६. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत महाजल (किमान गरजा कार्यक्रम), राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (NRDWP) सर्व बाह्य अर्थसहाय्यीत प्रकल्पांतर्गत (जलस्वराज्य प्रकल्पासह) राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी अंदाज पत्रके व आराखडे यासाठीचा २ टक्के निधी

तसेच तांत्रिक पर्यवेक्षणासाठी उपलब्ध होणारा ५ टक्के निधी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी जिल्हा स्तरावरील राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडून त्यामध्ये जमा करावा. कार्यकारी अभियंता यांचे नावे असे बचत खाते अस्तित्वात असल्यास नव्याने खाते उघडण्याची आवश्यकता नाही. मात्र या निधीचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. कंत्राटी पद्धतीने सेवा घेतलेल्या कनिष्ठ अभियंत्यांचे मासिक ठोक मानधन व त्यांच्या प्रवास भत्यावरील व भ्रमण दूरध्वनीवरील खर्च या निधीतून करण्यात यावा. या खर्चाव्यतिरिक्त शिल्लक राहणाऱ्या रकमेतून करावयाच्या खर्चासाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी.

७. उमेदवारांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्यासाठीच्या अटी, शर्तीसाठी व अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सूचना यासाठी परिशिष्ट-अ पहावे. उमेदवारांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेताना शासनाच्या सर्वसाधारण आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करावी.

८. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली सध्या कार्यरत असलेल्या कार्यकारी समितीस या कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्याचे अधिकार राहतील. या समितीने जास्त खप असलेल्या राज्य व जिल्हास्तरावरील प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन यकरिता अर्ज मागवावेत. विहीत कालावधीत अर्ज दाखल केलेल्या व दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची, १०० प्रश्नांसाठी १०० गुण याप्रमाणे असावी. या लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांची तांत्रिक क्षमता यासाठी ५० गुण, पंचायत राज व्यवस्थेबाबतची माहिती यासाठी ३० गुण, संगणक साक्षरतेसाठी १० गुण व जनसंपर्क व संवाद कौशल्य यासाठी १० गुण ठेवण्यात यावेत. लेखी परिक्षेत किमान ६० गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे. मुलाखत ५० गुणांची असावी. मुलाखतीमध्ये उमेदवाराची तांत्रिक क्षमता व पंचायत राज संस्थेची माहिती यासाठी समान गुण ठेवण्यात यावेत. लेखी परिक्षा व मुलाखतीमध्ये जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांची, आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे तपासून त्यांची निवडसूची तयार करावी. कामाच्या गरजेनुसार व परिच्छेद क्र.३ मधील निकषानुसार अशा निवडसूचीतून अभियंत्यांना त्यांच्या गुणक्रमानुसार कंत्राटी पध्दतीने नेमावे, व त्यांचेकडून सोबतच्या परिशिष्ट ब मध्ये विहित केल्यानुसार करारनामा करून घेण्यात यावा. केवळ जिल्हा सूचीवर आहे म्हणून कोणत्याही परिस्थितीत कामाच्या उपलब्धतेशिवाय अभियंत्यांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्यात येवू नयेत.

९. अशा प्रकारे सेवा घेण्यात आलेल्या कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना त्यांच्या दोन महिन्याच्या सेवेसाठी १ नैमित्तीक रजा किंवा कराराच्या एका वर्षाच्या कालावधीत ६ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील.

F:\2009\GRcr-9\CR ११५ ०९ GR ११०६०९.doc
रवा-१६३३[१२००-९-२००९]-३

१०.   कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा शर्ती, शैक्षणिक पात्रता, मासिक एकत्रित ठोक मानधन, कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्याबाबतची कार्यपध्दती या आणि इतर सर्व बाबी यामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

११.   सदर आदेश तात्काळ लागू होतील. मात्र ज्याठिकाणी योजनांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत, किंवा तांत्रिक सेवा पुरवठादारांना कामे देण्यात आलेली आहेत, अशा ठिकाणी सद्यस्थितीतील व्यवस्था कार्यरत राहील. मात्र, अस्तित्वातील तांत्रिक सेवा पुरवठादार जर काम व्यवस्थित करीत नसतील अशी तक्रार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केली तर, त्यांच्या जागी नवीन तांत्रिक सेवा पुरवठादार न नेमता कंत्राटी अभियंत्यामार्फत उर्वरित कामे पूर्ण करण्यात यावीत.

१२.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०९१११६४६४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजितकुमार जैन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

E:\Ganesh\GR-09-VCR १५५ ०९ GR ११०६०९.doc
एच-१६३३ -२३

# परिशिष्ट-अ

(शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७, दिनांक     ऑगस्ट, २००९ चे सहपत्र १)

**कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा घेण्यासाठीच्या अटी व शर्ती.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदाचे नाव | : | कनिष्ठ अभियंता |
| २. | शैक्षणिक अर्हता | : | अ) मान्यता प्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा पदवीका<br>ब) मराठीचे ज्ञान आवश्यक<br>क) संगणकाचे ज्ञान आवश्यक (**Computer literate with working knowldege MS-Office**) |
| ३. | वयोमर्यादा | : | १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे<br>**(मागासवर्गीयांसाठी ५ वर्षांनी शिथिलक्षम)** |
| ४. | मानधन | : | **एकत्रित ठोक मानधन रू. १०,०००/-प्रतिमाह**<br>**(पदविका धारकांसाठी)**<br>एकत्रित ठोक मानधन रू. १२,०००/- प्रतिमाह<br>**(पदवी धारकांसाठी)**<br>नियमानुसार प्रवासभत्ता देय राहील. |
| ५. | पदाची कर्तव्ये | : | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांचे अधिपत्याखाली काम करणे, ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अंदाज पत्रके व आराखडे तयार करणे, निविदा तयार करणे, योजनांच्या कामाचे संनियंत्रण करणे, योजनांच्या प्रगतीचा आराखडा तयार करणे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे व केलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल आवश्यक कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांना सादर करणे. |

६. अर्ज करण्याची पद्धत व सर्वसाधारण सूचना :

(१) उमेदवाराने जाड फुलस्केप कागदावर अर्ज सादर करावा, यामध्ये स्वतःचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम), जन्म दिनांक, वय, लिंग, पत्र व्यवहाराचा पत्ता (दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्रमांका सह), शैक्षणिक अर्हतेचा तपशिल, मागास वर्गीय असल्याबाबत प्रवर्ग अ.जा. / अ.ज./इ.मा.व./खुला गट इत्यादीबाबतचा उल्लेख, अनुभवाचा तपशिल इत्यादी माहितीसह अर्ज सादर करावा. अर्जाच्या वरील डाव्या बाजूस अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा, तो स्वसाक्षांकित करावा.

************************

F:\२००९\GR०९-१\CR ११५ ०९ GR [illegible] ०९.doc

# परिशिष्ट ब

(शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५/पापु-०७, दिनांक     ऑगस्ट, २००९ चे सहपत्र २)

## कंत्राटी कनिष्ट अभियंत्यांना कामासाठी घेताना त्यांचेकडून घ्यावयाचा करारनामा

**ZILLA PARISHAD ____________**

No.
Rural Water Supply Division,
Zilla Parishad,
Dated :- / /

To,
Shri. ____________

**Sub.**:- Contractual assignment as "**Junior Engineer / Engineer** for Rural Water Supply Programme

1 Set out below are the terms and conditions under which Shri.____________ is given this contractual assignment.

2 His services on contract basis are presently required in the **Rural Water Supply Division** in Zilla Parishad ____________

3 This Contractual assignment is given for a period of one year from the date ____________

4 Any decision taken on the basis of inputs pertaining to specific expertise possessed by the assignee appointed on contract, if results into a financial loss to the government, which if proved to have been caused due to lack of application of mind or dereliction of duty by him the Zilla Parishad shall have right to fix the responsibility upon him and recover the loss from him.

5 This contractual period of one year of the assignment may be shortened or terminated any time during this period depending upon the need and progress of the work. In the event of the termination of this assignment before the agreed period , he will be paid for the service rendered by him for carrying out the assignment till the date of termination of the contract and he will hand over his charge to the person authorized by Chief Executive Officer, Zilla Parishad them ,all the information and documentation possessed or gathered by him while rendering the service under this contract

6 His services will be exclusively utilized for Rural Water Supply Division, District under overall superintendence control and guidance of Executive Engineer, Zilla Parishad. ____________ and Chief Executive Officer, Zilla Parishad any other Officer including District Project Coordinator. He will perform his duties as per job chart given by Chief Executive Officer, Zilla Parishad and the State project management unit and shall be subject to performance appraisal . However, Chief Executive Officer, Zilla Parishad may assign him any other function, responsibility or task as regards the overall implementation of Jalswarajya Project in any part of the State.

[illegible] GR [illegible].doc

7 Chief Executive Officer, Zilla Parishad will pay him directly a fixed consolidated remuneration of Rs.------ (Rs ------------------) for the contract period of one year which will be reimbursed to him in equal installments at the rate of Rs.---------- (Rupees ----------) per month or proportionate period there of during the contract period at the end of every month or thereof on his satisfactory performance of the assignment for that month. The above rate is subject to deduction of any taxes, which are required to be lawfully deducted from his remuneration. The above remuneration may, positively, be changed by the Water Supply and Sanitation Deptt, if found necessary and it may be given effect at any point of time during this contract period.

8 No other remuneration, compensation or benefits are admissible to him for this contractual assignment except the reimbursement of the actual cost of travel and daily allowance while on tour on official duty and mobile / Internet at the rate of Rs.1000/- per month.

9 If he desires to leave the assignment for any reason before the termination of contractual period, he will give three month's notice or deposit equivalent remuneration in lieu of notice.

10 All materials produced or acquired under the terms of this agreement written graphic, film, and magnetic tape or otherwise, shall remain the property of Chief Executive Officer, Zilla Parishad. Water Supply and Sanitation Department retains the exclusive right to publish or dissemination reports arising from such materials. His responsibility and duties in this paragraph shall continue, not withstanding the termination of this contract for the execution of its other provisions

11 He also agrees that all knowledge and information not within the public domain which may be acquired during the carrying out of this contract, shall be for all the times and for all purposes, regarded as strictly confidential and held in confidence and shall not be directly or indirectly disclosed to any person whatsoever, except with the prior approval of District are in Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra

12 Clear understanding is given that this is purely a contractual engagement is not a job with Government of Maharashtra. .

13 Shri./Smt. ---------------- here by gives an undertaking that he will continue to serve the Rural Water Supply Division for the said period . His consolidated pay for a period of one month will be retained by the Project and shall be paid to him after the completion of the said period. It will be forfeited if he leaves the Project before the completion of said period.

14 Shri/ Smt. ------------------ hereby agree and give undertaking that, he/ she shall not put along claim whatsoever to regularise her/him in a permanent service.

15 Shri./Smt. ---------------- hereby agrees to carry out his assignment for Zilla Parishad on above terms and conditions and assures to give his services, accordingly for the acceptance of which, he has put his signature below:

I agree and accept the assignment

on above terms and conditions.

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १७.३.२०१०**

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दि. २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दि.०३ सप्टेंबर, २००१.
३) शासन परिपत्रक क्र. ग्रापापु- १००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दि. २३ मार्च, २००२.
४) च्राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमछ (National Rural Drinking Water Programme - NRDWP) बाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.
५) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दि. ०१ ऑगस्ट, २००९
६) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५ /पापु-०७, दि.०९ सप्टेंबर, २००९

**प्रस्तावना :**

ग्रामीण भागाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी, केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या मागणी आधारित धोरणांतर्गत विविध योजना तसेच बाह्यअर्थसहाय्यित जलस्वराज्य, आपलं पाणी प्रकल्पाच्या माध्यमातून नळ पाणी पुरवठा योजना, विंधण विहिरी, लघु पाणी पुरवठा योजना यासारख्या उपाययोजना राबविल्या जात आहेत. पाणी पुरवठ्याचे स्रोत बळकट करण्यासाठी शिवकालीन पाणी साठवण योजना तसेच महाराष्ट्र भूजल अधिनियम १९९३ अंतर्गत भूजल संवर्धनाच्या उपाययोजना केल्या जात आहेत. या माध्यमातून राज्यातील बहुतांश गावांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आलेला आहे. तरीही वाढती लोकसंख्या, भूजलाची घटत असलेली पातळी यामुळे उदभवणाऱ्या अडचणी व पाण्याची वाढती मागणी यामुळे अनेक प्रश्न समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन व राबविलेल्या कार्यक्रमाचा अनुभव लक्षात घेता राज्याच्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये काही बदल करणे आवश्यक झाले आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मागणी आधारित लोकसहभागाचे लोकाभिमुख धोरण स्विकारले आहे. या धोरणानुसार ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती संबंधित स्थानिक

स्वराज्य संस्थांनी करावयाची आहे. ही कार्यवाही जिल्हा परिषदा व ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून करण्यात येते. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना, आलेल्या अनुभवाच्या आधारे योजनांचे प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया, लोकसहभागातून गाव कृती आराखडे व त्याचा भाग म्हणून किफायतशीर नळ योजनेचे आराखडे तयार करणे व त्यांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्याची प्रक्रिया अधिक बळकट करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे. मागणी आधारित योजनांना केंद्र व राज्य शासनाने विहित केलेल्या प्राधान्यक्रमाशी निगडीत करणे हे देखील महत्वाचे आहे.

आर्थिक वर्ष सन २००९-१० पासून केंद्र शासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे रुपांतर **"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" (National Rural Drinking Water Programme - NRDWP)** असे केले आहे. या कार्यक्रमांतर्गत स्त्रोत शाश्वती, पाण्याची गुणवत्ता व कुटुंब पातळीवर जल सुरक्षा यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (व्याप्ती) NRDWP - (Coverage)

२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता) NRDWP - (Water Quality)

३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (स्त्रोत शाश्वती ) NRDWP - (Sustainability)

या कार्यक्रमांतर्गत गावाचे, जिल्हयाचे तसेच राज्याचे जल सुरक्षा आराखडे व वार्षिक कृती आराखडे तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भूजल व भूपृष्ठावरील पाण्याचा संयुक्त व शाश्वत वापर, भूजल संवर्धन, पाण्याची गुणवत्ता या बाबींवर या कार्यक्रमामध्ये भर राहणार आहे. पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन स्थानिक संस्थेकडे असण्यावर सुध्दा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा भर आहे. महाराष्ट्र राज्यात पाणी पुरवठा व स्वच्छतेचे काम २००० पासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेले आहे. क्षेत्रीय सुधारणा व स्वजलधारा कार्यक्रमासोबतच शासनाने बाहय अर्थसहाय्यित जलस्वराज्य व आपलं पाणी तसेच केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी भारत निर्माण प्रकल्प याच तत्वावर राबवून लोकसहभागाची प्रक्रिया रुजविली आहे. या प्रकल्पांतर्गत लोकांचा सक्रीय सहभाग असल्याने अशा योजनांची गुणवत्ता निश्चित चांगली असल्याचे दिसून आले आहे, म्हणून या प्रक्रियेचे ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमात सार्वत्रिकरण करणे

क्रमप्राप्त झाले आहे. तसेच ग्रामीण पातळीवर योजनांची मागणी, आखणी व अंमलबजावणी करीत असताना निदर्शनास आलेल्या काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणींच्या अनुभवावर काही धोरणात्मक सुधारणा करणेही गरजेचे झाले आहे.

संदर्भ क्र.४ येथील केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी राज्यस्तरावर महाराष्ट्र पाणी पुरवठा व स्वच्छता संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संस्थेची रचना, कार्यकक्षा व कार्यपध्दती याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे. विभागीय व जिल्हा पातळीवर राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेचे स्थानिक सहाय्य गट (local support units) स्थापन केले जाणार आहेत. यापुढे पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे संचलन या संस्थेमार्फत होणार असून, विभागीय व जिल्हा पातळीवरील स्थानिक सहाय्य गटांना तांत्रिक सहाय्य व त्यांची क्षमता बांधणी इ.करिता ही संस्था काम करणार आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिकाधिक परिणामकारक व्हावी यासाठी योजना अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित पध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्यासाठी संदर्भ क्र-५ येथील या विभागाच्या समक्रमांकाचा दि. ०१ ऑगस्ट, २००९ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. हा शासन निर्णय शासनाच्या मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणाशी अधिक सुसंगत असावा आणि पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करता यावी म्हणून या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

संदर्भ क्र-५ येथील या विभागाचा समक्रमांकाचा दि. ०१ ऑगस्ट, २००९ चा शासन निर्णय अधिक्रमित करून आर्थिक वर्ष २००९-१० पासून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१. धोरणातील तत्व व प्राधान्यक्रम**

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या किफायतशीर व शाश्वत उपाययोजना घेता याव्यात व त्या संबंधित लाभार्थ्यांना परवडाव्यात, या उद्देशाने यापुढे ग्रामीण भागात नव्याने घ्यावयाच्या पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांविषयी निर्णय घेताना खालील तत्वे व प्राधान्यक्रमाचा विचार व्हावा :-

१.१ गावात अस्तित्वात असलेल्या सर्व पिण्याच्या पाण्याच्या उपाययोजनांचा (existing drinking water infrastructure) आढावा घेऊन त्यातील स्त्रोतांचे संवर्धन व बळकटीकरण करणे, अस्तित्वात असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करणे.

१.२ गुणवत्ताबाधीत गावांमध्ये सुरक्षित स्त्रोत विकसित करण्याकरिता उपाययोजना घेणे.

१.३ गावाच्या लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे पूरक योजनांचा विचार करणे.

१.४ उपाययोजना प्रस्तावित करताना, वेगवेगळया विकल्पापैकी, किमान खर्चावर आधारित विकल्पाचा विचार करणे.

१.५ एका गावातील वाडया/वस्त्यांसाठी एकच योजना करण्यापेक्षा विकेंद्रीत उपाययोजना किफायतशीर असल्यास त्याला प्राधान्य देणे. योजना आखताना सर्व भूजल व भूपृष्ठावरील सार्वजनिक व खाजगी स्त्रोतांचा अभ्यास करुन नियोजन करणे.

१.६ प्रस्तावित नळ योजनांमध्ये स्त्रोत बळकटीकरण व १००% घरगुती नळ जोडण्याचा समावेश अनिवार्य करणे.

१.७ जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवर प्रस्तावित उपाययोजनेचा भाग म्हणून **गाव कृती आराखडा** तयार करणे बंधनकारक राहील. या अंतर्गत लोकसहभागातून गावातील सर्व स्त्रोतांचा सर्वकष विचार करुन पाण्याचा ताळेबंद तयार करणे.

१.८ पाण्याची गुणवत्ता टिकविण्याकरिता गावातील संपूर्ण स्वच्छता आवश्यक असून गाव हागणदारी मुक्त होणे ही अट नवीन योजनांचे काम सुरु करण्याकरिता अनिवार्य करणे.

१.९ योजना मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

**२. तांत्रिक व प्रशासकीय मान्यता**

२.१ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे नियोजन व आखणी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून लोकसहभागाच्या तत्वाच्या आधारे करण्यात यावी. योजनांच्या गाव कृती आराखडयास व अंदाजपत्रकास ग्रामसभेचा ठराव पारित झाल्यावर सक्षम प्राधिकरणांनी **आधी तांत्रिक व नंतर प्रशासकीय मान्यता द्यावी.**

२.२ रु. ५०.०० लाखापर्यंत योजनांना तांत्रिक मान्यता जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता देतील. रु.५०.०० लाखाच्या वर व रु.२.५ कोटीपर्यंत किंमतीच्या योजनांना विभागीय अधिक्षक अभियंता (NRDWP) व रु.२.५ ते ५.०० कोटीवरील योजनांना तांत्रिक मान्यता राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता संस्थेचे मुख्य अभियंता देतील. रु.५.०० कोटीच्या वरील योजनांना सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे तांत्रिक मान्यता प्रदान करतील.

२.३ रू.५.०० कोटीपर्यंत किमतीच्या योजनेस जिल्हा परिषदेच्या जल व्यवस्थापन समितीने प्रशासकीय मान्यता द्यावी. रू.५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या योजनांना शासन स्तरावर मान्यता देण्यात येईल. दरडोई खर्चाच्या निकषामध्ये न बसणाऱ्या सर्व योजना शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात याव्यात. यासंदर्भातील दिनांक ३ सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयातील तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेबाबतच्या तरतूदी रद्द समजण्यात याव्यात.

२.४ यापुढे पाणी पुरवठा योजनांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. जिल्हा परिषद व राज्य स्तरावर तांत्रिक/प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजना जिल्हा व राज्य आराखडयामध्ये समाविष्ट करण्यात येतील व जिल्हा आराखडयाला राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता मिळाल्यानंतरच योजनांची अंमलबजावणी सुरु करता येईल.

**३. योजनांची अंमलबजावणी**

३.१ रू. ५० लाखपर्यंत किंमतीच्या योजनांची अंमलबजावणी ग्रामपंचायत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या करतील व योजना पूर्ण झाल्यावर त्यांची देखभाल व दुरुस्ती करतील. रू. ५०.०० लाख ते रु. ५.०० कोटी किंमतीपर्यंच्या **स्वतंत्र** योजनांची अंमलबजावणी ही ग्रामपचांयत / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करील. या योजनांची अंमलबजावणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद लेखा संहितेमध्ये विहित केल्याप्रमाणे निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा. योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी ग्रामपंचायतीने / ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने संबंधित ठेकेदाराशी करारनामा करताना त्यामध्ये ही अट घालावी की, योजना पुर्ण झाल्यानंतर ठेकेदार किमान १ वर्ष ही योजना चालवेल.

३.२ रु.५.०० कोटी किमंतीवरील स्वतंत्र योजना अपवादात्मक परिस्थितीत अत्यावश्यक असल्यासच घेण्यात याव्यात. या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ग्रामपंचायत / ग्राम पार्ण

पुरवठा व स्वच्छता समितीच्या नियंत्रणाखाली करण्यात येईल. योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधित ठेकेदाराशी करारनामा करतांना त्यामध्ये ही अट घालावी की, योजना पुर्ण झाल्यानंतर ठेकेदार किमान १ वर्ष ही योजना चालवेल. त्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायत / ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करेल.

३.३ रु. ५.०० कोटीपर्यंतच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेने करावी. रु.५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रादेशिक योजनांची अंमलबजावणी मजीप्रा मार्फत करण्यात यावी. योजना पूर्ण झाल्यानंतर ती यशस्वीरित्या पूर्ण झालेली आहे, हे पडताळण्यासाठी जिल्हा परिषदेने (रु.५.०० कोटीपर्यंतच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी) / मजीप्राने (रु.५.०० कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रादेशिक योजनांसाठी) योजना पुर्ण झाल्यानंतर ठेकेदार किमान १ वर्ष ही योजना चालवेल अशी अट संबंधित ठेकेदाराशी करारनामा करताना करारनाम्यात घालावी. प्रादेशिक योजनांच्या देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन संबंधित ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समित्यांच्या शिखर समितीमार्फत रु.५.०० कोटीपर्यंतच्या योजनांसाठी जिल्हा परिषदेच्या सहाय्याने आणि रु.५.०० कोटी पेक्षा जास्त खर्चाच्या योजनांसाठी मजीप्राच्या सहाय्याने करण्यात येईल.

३.४ भूजल पुनर्भरणाच्या पारंपारिक व अपारंपारिक उपाययोजना शिवकालीन पाणी साठवण योजनांच्या तत्वानुसार व वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार यापुढेही राबविण्यात येतील व या योजनांना परिच्छेद १.१ नुसार प्राधान्य देण्यात येईल.

## ४. तांत्रिक सहाय्य व संनियंत्रण

रु.५.०० कोटीपर्यंतच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रकारे होईल, तसेच त्यांचे संनियंत्रण चांगल्या प्रकारे होईल हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असेल. रू. ५०.०० लाख ते रू. ५.०० कोटी पर्यंत योजनांची तांत्रिक गुणवत्ता तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून पुढील निकषाप्रमाणे करण्यात येईल. रु.५०.०० लक्ष ते रु.२.५ कोटी पर्यंतच्या कामाची गुणवत्ता तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाच्या अधिक्षक अभियंता मार्फत तर रु. २.५ कोटी ते रु.५.०० कोटी पर्यंत योजनांची गुणवत्ता तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंत्यांमार्फत करण्यांत येईल. रु.५.०० कोटीवरील योजनांसाठी अंमलबजावणी तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रकारे होईल, तसेच त्यांचे संनियंत्रण चांगल्याप्रकारे होईल, ही जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बांधलेल्या योजनांची ही त्रयस्थ संस्थेकडून बाहय मूल्यमापन करण्यात येईल.

ग्रामपंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे, योजनांचे पर्यवेक्षण करणे ही कामे यापुढे तांत्रिक सेवा पुरवठादारांऐवजी जिल्हा परिषदांकडील नियमित व कंत्राटी अभियंत्यामार्फत पार पाडण्यात येतील.

नियमित अभियंत्यांना निकषाप्रमाणे काम दिल्यानंतर, गरजेनुसार किमान पाच ग्रामपंचायतींच्या नळ पाणी पुरवठा योजना किंवा रुपये २.०० कोटीपर्यंतच्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी १ कनिष्ठ अभियंता, या निकषाच्या आधारे कंत्राटी अभियंता करार तत्वावर घेता येतील. सदर कंत्राटी अभियंते जिल्हा सहाय्य कक्षाचे घटक असतील. कंत्राटी अभियंते घेण्याबाबतचे निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत सविस्तर सूचना संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तांत्रिक सेवा पुरवठादारांबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रक, दिनांक २३ मार्च, २००२ रद्द समजण्यात यावे. मात्र, प्रगतीपथावर योजनांवरील कंत्राटी अभियंत्यांची नियुक्ती होईपर्यंत तांत्रिक पुरवठादार व्यक्ती/संस्था काम चालू ठेवतील व त्यांना केलेल्या कामाच्या प्रमाणात मानधन देण्यात यावे.

**५. योजनांची देखभाल व दुरुस्ती**

योजनेचे बांधकाम दर्जेदार व्हावे याची खात्री करण्याकरिता तसेच योजना पूर्ण झाल्यानंतर हस्तांतरणाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून जी संस्था योजनेची अंमलबजावणी करील, त्याच संस्थेने योजनेची देखभाल व दुरुस्ती करावी म्हणूनच योजनांची देखभाल दुरुस्ती वरील परिच्छेद ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**६. योजनांचे नियोजन व अंमलबजावणीची कार्यपध्दती**

६.१ आर्थिक वर्ष २००९-१० पासून राज्य शासनाचा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम व केंद्र शासनाचा "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" यांची अंमलबजावणी राज्यात अधिकाधिक प्रभावीपणे व नियोजनबध्द पध्दतीने करता यावी, यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तावित उपाययोजनांच्या सूक्ष्म नियोजनाअंती दरवर्षी सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करण्यात यावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. हा आराखडा तयार करण्यासाठी सर्वप्रथम राज्यातील सर्व गावे/वाडयांना *सेन्सस* गावाच्या कोडशी (जनगणना सांकेतांक) निगडीत करुन त्याची Online माहिती

भरावी. ही कार्यवाही झाल्यानंतर त्या त्या गावे/वाडयांची त्यावर्षीची अंदाजित लोकसंख्येची माहिती भरण्यात यावी.

६.२ गावे/वाडयांमधील निकषानुसार किती लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते, या आधारे संबंधित गावे/वाडया पूर्णत: किंवा अंशत: हाताळलेल्या आहेत, हे ठरवावे. केंद्र शासनाच्या निकषानुसार गाव/वाडीस पाणी मिळते किंवा नाही याची निश्चिती या गावे/वाडीस उन्हाळयामध्ये किती लोकसंख्येला पाणी मिळाले या आधारे करावी. सर्व उपाययोजनांमधून उपलब्ध होणारे पाणी व भूजल आणि भूपृष्ठावरील स्त्रोतांमधून लागणाऱ्या अधिकच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन गावातील सर्व नागरिकांना घरोघरी किमान ४० लिटर दरडोई दरदिवशी प्रमाणे पाणी उपलब्ध होईल असा कृती आराखडा तयार करावा. प्रत्येक वर्षी कृती आराखडयात समाविष्ट केलेल्या गावे/वाडयांना Website वर Targeted habitation म्हणून दर्शवावे.

६.३ आराखडयातील प्रगतीपथावरील योजना व नवीन योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वर्गीकरणानुसार अर्थात coverage, quality व sustainability प्रमाणे वर्गवारी करुन निश्चित कराव्यात. सदर कृती आराखडा कोणत्याही परिस्थितीत दरवर्षी **परिच्छेद ११** मधील वेळापत्रकाप्रमाणे तयार करण्यात यावा. कृती आराखडयात प्रगतीपथावरील, प्रशासकीय मान्यता मिळालेल्या व तत्वत: मान्य केलेल्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात यावा. कृती आराखडयात योजनानिहाय व टप्पानिहाय आवश्यक तरतूद व अर्थसंकल्पीय शीर्षही दर्शवावे.

६.४ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी नियोजनबध्द व विहित कालावधीत व्हावी व हाती घेतलेल्या योजनांची कामे विविध अडचणींमुळे प्रलंबित राहू नयेत यासाठी राज्यात यापुढे नव्याने मंजूर करावयाच्या नळ पाणी पुरवठा योजना नियोजन, अंमलबजावणी व बहिर्गमन अशा टप्प्यात राबविण्यात येणार आहेत.

## ७. नियोजन टप्पा (Planning Phase)

### योजनेची मागणी

७.१ गावे/वाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता भासल्यास ग्रामपंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अस्तित्वात असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सर्व उपाययोजना व स्त्रोतांचा अभ्यास करुन उपरोक्त परिच्छेद-१ मध्ये सूचविलेल्या प्राधान्यक्रमानुसार उपाययोजना प्रस्तावित करता येतील. प्रस्तावित

योजना नळ योजना किंवा विंधण विहिर/साध्या विहिरीवर आधारित किंवा एखाद्या विशिष्ट उपांगाची असू शकेल. प्रस्तावासोबत गावातील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबतची संपूर्ण माहिती या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये ग्राम पंचायतीच्या ठरावासह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.

७.२ ज्या गावात प्रादेशिक योजना किंवा स्वतंत्र योजना अस्तित्वात आहे परंतु पाणीपट्टीची वसूली न झाल्यामुळे ती बंद आहे त्या गावांकरिता नवीन योजना मंजूर करण्यात येणार नाही. तसेच प्रादेशिक योजनांमध्ये असलेल्या गावात स्वतंत्र योजना मान्य केली जाणार नाही. आवश्यकतेप्रमाणे अशा योजनांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावावर मात्र विचार करता येईल.

७.३ प्रस्तावित उपाययोजनेचा विचार करण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीने पुढील अटींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

अ) यापुर्वी ज्या योजना कार्यान्वित झालेल्या आहेत, अशा योजनांचा एकूण देखभाल दुरुस्ती खर्च विचारात घेऊन वार्षिक पाणी पट्टीची आकारणी करण्यात यावी, दरवर्षी पाणी पट्टीमध्ये किमान ५ टक्के वाढ करण्यात यावी, योजनेच्या देखभाल दुरुस्तीमध्ये तसेच वीज देयकांमध्ये अनपेक्षित वाढ झाल्यास, त्याअनुषंगाने पाणीपट्टीच्या दरांमध्ये वाढ करण्यात यावी.

ब) प्रस्ताव तयार करताना संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत संबंधित गाव किमान ६० टक्के हागंदारीमुक्त असले पाहिजे. सदर गाव टप्प्या टप्प्याने १०० टक्के हागंदारी मुक्त झाले पाहिजे, असे हमीपत्र ग्रामसभेच्या ठरावाद्वारे गावाने सादर करावे आणि पुढे त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापूर्वी गाव १००% हागंदारी मुक्त झाले पाहिजे.

क) भूजलाच्या व्यवस्थापनाकरिता ग्रामपंचायतीने नागरिकांच्या सहभगातून पाण्याचा ताळेबंद तयार करून पाण्याच्या स्त्रोताच्या व्यवस्थापनाचा आराखडा तयार करावा.

ड) प्रत्येक गाव कृती आराखड्यामध्ये भूजल पुर्नभरणाशी संबंधित आवश्यक उपाययोजना उदा. छतावरील पाऊसपाणी संकलन, विहिर पुर्नभरण इत्यादीं शिवकालीन पाणी साठवण उपाययोजनंचा समावेश करणे बंधंनकारक राहील.

**प्रस्तावाची तांत्रिक तपासणी**

७.४ ग्रामपंचायतीकडून मागणीपत्र आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, सहाय्यक भूवैज्ञानिक व गट विकास अधिकारी यांचेमार्फत प्रस्तावाची तात्रिक तपासणी व स्थळ पाहणी करावी व ढोबळ अंदाजपत्रक तयार करावे. ग्रामपंचायतीने प्रस्तावित केलेली उपाययोजना परिच्छेद १ मधील प्राधान्यक्रमानुसार उचित आहे अथवा कसे याची शहानिशा करावी. तांत्रिकदृष्ट्या सर्वात उपयुक्त आणि किमान खर्चाच्या (Least Cost Solution) विकल्पाबाबत स्थानिक लोकांशी चर्चा करुन अभिप्राय सादर करावेत. या आधारे प्रस्तावित योजनेची तांत्रिक तपासणी उपाययोजनेच्या अंदाजित किंमतीनुसार सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांनी करावी.

७.५ जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन रू.५.०० कोटीपेक्षा कमी किंमतीच्या योजनेस सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या तांत्रिक तपासणी अहवालानुसार जिल्हा परिषदेने तत्वतः मान्यता द्यावी. त्यापेक्षा अधिक किंमतीच्या योजनेची शिफारस शासनाकडे करावी. जिल्हा परिषदेच्या आर्थिक मर्यादेतील योजनेची तत्वतः मान्यता जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीला कळवावी. शासनाच्या अधिकार क्षेत्रातील योजनेच्या तत्वतः मान्यतेच्या बाबतीत अशी कार्यवाही पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग करेल. तत्वतः मान्यता दिलेल्या योजनांचा समावेश वार्षिक जिल्हा कृती आराखडयात करावा व त्याला राज्यस्तरीय समितीची मान्यता घ्यावी.

**गाव कृती आराखडा तयार करणे व योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता**

७.६ गावाच्या/वाडीच्या उपाययोजनेला तत्वतः मान्यता दिल्यानंतर व कृती आराखडयात समावेश झाल्यानंतर रू.५.०० कोटीपेक्षा कमी खर्चाच्या योजनांची संकल्पचित्रे, आराखडा व सविस्तर अंदाजपत्रके जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी (तांत्रिक आधिका-यांमध्ये कंत्राटी अभियंत्यांचा समावेश राहील) तयार करावीत. स्त्रोतांच्या कामांबरोबरच त्यांच्या शाश्वततेच्या दृष्टीकोनातून भूजल पुनर्भरणाच्या कामांचे नियोजन करुन त्याचाही समावेश अंदाजपत्रकात करण्यात यावा. गावात उपलब्ध असलेल्या भूजल व भूपृष्ठावरील सर्व स्त्रोतांच्या संयुक्त वापरावर आधारित योजना प्रस्तावित करावी. नियोजन करताना उपलब्ध खाजगी स्त्रोतांचाही विचार करावा. रु. ५.०० कोटी रकमेपर्यंतच्या प्रादेशिक योजनांकरीता तांत्रिक सहाय्यासाठी जिल्हा परिषदेकडील नियमित व कंत्राटी अभियंते जबाबदारी पार पाडतील; आणि रुपये ५.०० कोटींपेक्षा अधिक रकमेच्या योजनांकरीता तांत्रिक सहाय्यासाठी मजीप्राकडील तांत्रिक अधिकारी जबाबदारी पार पाडतील. योजनेत तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास आणि अशा बिघाडाबाबत शासनस्तरावर /

प्राधिकरणस्तरावर सखोल चौकशी केल्यानंतर जर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती जबाबदार नसल्याचे आढळून आल्यास जिल्हापरिषदेकडील नियमित अथवा कंत्राटी अभियंते किंवा मजीप्राकडील तांत्रिक अधिकारी जबाबदार राहतील.

७.७ योजनेची आखणी नागरिकांच्या सक्रीय सहभागाने करण्यात यावी. गाव कृती आराखडा (Village Action Plan) तयार करुन त्यामध्ये योजनेचा भांडवली खर्च, योजना पूर्ण झाल्यावर ती चालविण्यासाठी आकारावयाची वस्तुनिष्ठ पाणीपट्टी स्पष्ट नमूद करावी. अशा गाव कृती आराखडयास ग्रामसभेची मान्यता घ्यावी. अशा ग्रामसभेला ज्या गाव/वाडी/ वस्ती साठी योजना प्रस्तावित आहे, त्या गाव/वाडी/ वस्तीतील मतदारांच्या संख्येच्या एकूण संख्येच्या किमान २५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहील. जर एवढ्या गणपुर्तीअभावी ग्रामसभा होऊ शकली नाही. तर पुन्हा घ्यावयाच्या ग्रामसभेसाठी एवढ्याच गणपुर्तीची आवश्यकता राहील. जिल्हा परिषदेचा / मजीप्राचा संबंधित योग्य पातळीवरील तांत्रिक अधिकारी या ग्रामसभेस उपस्थित असणे बंधनकारक राहील. गाव कृती आराखड्यात प्रस्तावित योजनेकरिता आवश्यक असलेली लोकवर्गणी व पाणीपट्टीच्या आकारणीबद्दल स्पष्ट उल्लेख असावा. ग्रामसभेचा ठराव पारित झाल्यानंतर योजनेच्या अंदाजपत्रकाला प्रथम तांत्रिक मान्यता सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याने द्यावी. त्यानंतर, रु.५.०० कोटीपर्यंतच्या योजनेस जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता द्यावी. त्यापेक्षा जास्त किमतीच्या योजना प्रशासकीय मान्यतेकरिता शासनाकडे सादर कराव्यात.

७.८ नवीन धोरणानुसार स्त्रोत, उर्ध्व नलिका व साठवण व वितरण व्यवस्थेची कामे व वेगवेगळया टप्यात कार्यान्वित करावयाची आहेत. योजनेचे काम जरी टप्पानिहाय करावयाचे झाले तरी योजनेला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता सुरुवातीलाच देण्यात यावी. मात्र, कामामध्ये स्त्रोत, पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, पाईप लाईन, साठवण व वितरण व्यवस्थेचे वेगवेगळे भाग दर्शवावेत. योजनेचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी प्रचलित दरसूचीचा विचार करावा व कोणत्याही भाववाढीची तरतूद करु नये.

**भूसंपादन, आवश्यक परवाने व लोकवर्गणी**

७.९ या टप्प्यांतर्गत प्रस्तावित योजनेसाठी आवश्यक त्या जमिनीचे संपादन, महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे इत्यादी विभागांची परवानगी ग्रामपंचायतीने घ्यावयाची आहे. त्याकरिता जिल्हा परिषदेने आवश्यक ती प्रशासकीय मदत ग्रामपंचायतींना करावी. नियोजन व पूर्वतयारीच्या सर्व प्रकारच्या कामासाठी लागणारा निधी ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नातून व लोकवर्गणीतून उपलब्ध करावा. योजनेची एकूण लोकवर्गणी ग्रामपंचायतींने स्वतःच्या उत्पन्नातून किंवा लोकांकडून एकत्र करून भरावी.

लोकवर्गणीची रक्कम ग्राम पंचायतीने जर स्वतःच्या उत्पन्नातून भरली तर सदर रक्कम संबंधीत लाभार्थ्यांकडून पाणी पट्टी बरोबर वसूल करणे बंधनकारक राहील. योजनेच्या नियोजनावर व पुर्वतयारीवर झालेला खर्च योजनेच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करावा. हा खर्च १० टक्के लोकवर्गणीचा भाग म्हणून राहील.

७.१० ज्या गावे/ वाड्यांमध्ये प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना घेण्याचे प्रस्तावित आहे, अशा गावे / वाडयांमध्ये स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनेव्दारे वर्षातील काही कालावधीसाठी पाणी पुरवठा होत असण्याची शक्यता असते, ही बाब विचारात घेऊन अशा ठिकाणच्या प्रादेशिक योजनांचे नियोजन करताना या योजना कार्यान्वित झाल्यावर, त्याठिकाणची मुळ व्यवस्था व नव्याने होणारी व्यवस्था संयुक्तपणे कार्यान्वित करून, त्याद्वारे, मासिक आधारावर पाणीपुरवठयाचे वार्षिक नियोजन करावे. तद्नंतर मासिक पाणी पट्टीचा दर निश्चित करतांना दोन्ही योजनांमधील दरांची सरासरी विचारात घेऊन येणारी योग्य रक्कम ही पाणी पट्टीची रक्कम निश्चित करण्यात यावी; आणि या दराने लाभार्थ्यांकडून वसुली करण्यात यावी.

७.११ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, ४० लिटर किंवा ४० लिटरपेक्षा जास्त दरडोई दरदिवशी पाणी पुरवठयासाठी १० टक्के लोकवर्गणी लागू राहील.

७.१२ भूजल पुनर्भरण करुन स्त्रोत बळकटीकरणाकरीता स्वतंत्ररित्या घेतलेल्या रु.१०.०० लाखापर्यंतच्या खर्चाच्या उपाययोजनांसाठी लोकवर्गणीची अट लागू राहणार नाही. मात्र ज्या गावांमध्ये नवीन योजनेसह स्त्रोत बळकटीकरणाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत, अशा गावांमध्ये स्त्रोत बळकटीकरणाच्या कामांसाठी १०% लोकवर्गणी अनुज्ञेय राहील.

## ८. अंमलबजावणी टप्पा (Execution Phase)

**निविदा प्रक्रिया :**

८.१ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर व वार्षिक कृती आराखडयात प्रस्तावित योजना समाविष्ट झाल्यावर योजनेच्या खालील तीनही उपांगाबाबत एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

उपांग - १ स्त्रोतांचा विकास

उपांग - २ पंप गृह, पंपीग मशिनरी, उर्ध्व वाहिनी, गुरुत्व वाहिनी व आवश्यक असल्यास जल शुद्धीकरण केंद्र

उपांग - ३ साठवण टाकी व घरगती नळ जोडण्यासह वितरण व्यवस्था

निविदा प्रक्रिया तीनही उपांगाकरिता जरी पूर्ण करण्यात आली तरी, कामाचे आदेश मात्र सुरुवातीस उपांग-१ च्या कामाकरिता देण्यात यावेत. सदर काम पूर्ण झाल्यावर स्त्रोत योग्य व पुरेसा

असल्याबाबत सक्षम प्राधिका-याकडून (उदा. GSDA इ.इ.) प्रमाणित करून घ्यावे. उपांग-१ चे काम पूर्ण झाल्यानंतरच उपांग-२ चे कार्यादेश देण्यात यावेत आणि उपांग-२ चे काम पूर्ण झाल्यानंतरच उपांग-३ च्या कामाचे आदेश देण्यात यावेत. **ही बाब निविदा प्रक्रियेत व करारपत्रात स्पष्ट नमूद करावी.**

उपांग-२ व ३ चे काम उपांग-१ च्या नंतर क्रमाक्रमाने होणार असल्याने व त्या काळात दरसूचीमध्ये बदल होणे शक्य असल्याने, पुढील दरसूचीतील संभाव्य वाढ लक्षात घेऊन सर्वात कमी दराच्या निविदेच्या बाबतीत निर्णय घ्यावा.

उपरोक्त तीनही उपांगाची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. कामे पूर्ण करण्यास विलंब केल्यास, संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करावयाचे कलम निविदेत ठेवण्यात यावे.

रु.५ कोटी किंमतीवरील योजनेकरीता ठेकेदार निवडतांना या ठेकेदारांची निविदा पूर्व अर्हता (pre-qualification) मजीप्राने निश्चित करावी. अशा अर्हतेचा निविदा सूचनेमध्ये स्पष्ट उल्लेख असावा.मजीप्राने अशी पुर्व अर्हता ठरविताना निकोप स्पर्धेस बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**स्त्रोतांचा विकास**

८.२ सर्वप्रथम योजनेच्या स्त्रोतांची (भूपृष्ठ अथवा भूजलाधारित स्त्रोतांची) कामे हाती घ्यावीत. भूजलाधारित स्त्रोतांचे काम पूर्ण झाल्यानंतर पावसाळयापूर्वी त्याची चाचणी करावी. स्त्रोतांच्या कामाबरोबरच स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीकोनातून भूजल पुनर्भरणाची कामे हाती घेण्यात यावीत. स्त्रोतांचे खोदकाम झाल्यावरच त्याची क्षमता चाचणी (Yield Test) करुन भूजल विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र प्राप्त करावे व नंतर त्यांचे बांधकाम पूर्ण करावे.

**पंपिंग व्यवस्था, उर्ध्व/गुरुत्व वाहिनी व जल शुद्धीकरण केंद्र**

८.३ स्त्रोतांचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी/ गुरुत्व वाहिनी व आवश्यक असल्यास जलशुध्दीकरण केंद्राच्या कामांना सुरवात करावी. ही कामे पूर्ण झाल्यावर व विद्युत जोडणी मिळाल्यानंतर योजनेतील स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारे पाणी गावातील अस्तित्वात असलेल्या साठवण टाकी/वितरण व्यवस्थेशी जोडून पाणी पुरवठा सुरु करण्यात यावा. या टप्प्यामध्येच प्रत्येक घराच्या पाणीपट्टीची आकारणी करुन वसूलीची कार्यवाही सुध्दा सुरु करावी.

**साठवण टाकी व वितरण व्यवस्था**

८.४ पंप हाऊस, पंपिंग मशिनरी, उर्ध्व वाहिनी/गुरुत्व वाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र इ. कामे समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर योजनेतील सांठवण टाकी व वितरण व्यवस्थेची कामे हाती घेण्यात यावीत. **वितरण व्यवस्थेअंतर्गत सर्व घरांना नळ जोडण्या देण्यात याव्यात.** हे काम पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा सुरु करुन एकंदरीत नळ योजनेची चाचणी करावी.

**९. बहिर्गमन टप्पा (Exit Phase)**

योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर नळ योजना चालविण्याकरिता पूर्व नियोजनानुसार व्यवस्था निश्चित करावी. जेथे शक्य असेल तेथे स्वयंसहायता गट, अन्यथा इतर सक्षम संस्थेमार्फत नळ योजनांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीने करावे. या टप्प्यामध्ये आधीच्या सर्व टप्प्यामध्ये झालेल्या खर्चाचे वित्तीय लेखा परीक्षण, सामाजिक लेखा परीक्षण व तांत्रिक परीक्षण होऊन योजनेतील त्रुटी दूर करुन व लेखे पूर्ण करुन बहिर्गमनाची (Exit) कार्यवाही करावी.

१०. वरीलप्रमाणे जिल्हयातील योजनांचे टप्पानिहाय नियोजन केल्यानंतर जिल्हयात एका वर्षामध्येच नवीन योजनेचे सर्व टप्पे हाती घेणे शक्य होणार नाही. निधीची संभाव्य उपलब्धता विचारात घेऊन त्या आर्थिक वर्षात जेवढया योजनांची कामे हाती घेता येतील, त्यांचे नियोजन करून जिल्ह्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात यावा व त्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी करावी. सर्व जिल्ह्यांकडून प्राप्त झालेले आराखडे व निधीची मागणी व उपलब्धतेच्या आधारे राज्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येईल व त्याला राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता देण्यात येईल.

**११. निधी वितरण**

१० टक्के लोकवर्गणी जमा केल्यानंतर शासनाकडून दिली जाणारी ९० टक्के रक्कम तीन हप्त्यात देण्यात यावी. सदर रक्कम पहिला हप्ता ३० टक्के, दुसरा ३० टक्के व तिसरा ३० टक्के या प्रमाणात वितरीत करण्यात यावी. उर्वरित १० टक्के निधी योजना पुढील एक वर्ष यशस्वीरित्या चालविल्यानंतर अदा करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत योजनेच्या कामांसाठी ग्रापापुसमितीकडून आगाऊ रक्कम ठेकेदारास / पुरवठादारास अदा केली जाणार नाही.

**१२. वेळापत्रक**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची मागणी, तांत्रिक तपासणी, तत्वतः मान्यता, सविस्तर गाव कृती आराखडे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता व जिल्हयाचे व राज्याचे कृती आराखडे तयार करण्याचे

वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील. हे वेळापत्रक तयार करण्यामागील हेतू योजनांची अंमलबजावणी कालबध्द पध्दतीने व्हावी आणि योजनेस टप्पानिहाय आर्थिक तरतूद उपलब्ध व्हावी असा आहे. या दृष्टीकोनातून वेळापत्रकामध्ये संभाव्य अंमलबजावणीच्या टप्प्याचा देखील समावेश करण्यात आलेला आहे.

एका विशिष्ट वर्षाचा कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया आधीच्या वर्षामध्येच सुरु होईल. प्रत्येक वर्षीच्या कृती आराखडयामध्ये साहजिकच प्रगतीपथावरील योजनेचा समावेश असेल. त्याबरोबरच त्याच वर्षातील तत्वतः मान्य झालेल्या योजनांचा समावेशही असेल. त्यामुळे त्याच वर्षामध्ये एकीकडे प्रगतीपथावरील योजनेची अंमलबजावणी चालू राहील व त्यावर उपलब्ध असलेला निधी खर्च करण्यात येईल, तर दुसरीकडे तत्वतः मान्य योजनांचा विस्तृत गाव कृती आराखडा, तांत्रिक तसेच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण होईल. त्याचबरोबर अंमलबजावणीचा भाग म्हणून कृती आराखडयामध्ये स्त्रोत विकसित करण्याविषयी तरतूद करण्यात येईल.

**योजनेची मागणी व त्यापुढील कार्यवाहीचे वेळापत्रक**

| टप्पा | कार्यवाही | विहीत कालावधी |
|---|---|---|
| नियोजन टप्पा | योजनेची मागणी व तांत्रिक तपासणी | एप्रिल-मे |
| | योजनेस तत्वतः मान्यता व चालू वर्षाच्या कृती आराखडयात समावेश | जूनपर्यंत |
| | गाव कृती आराखडे तयार करणे व त्यास ग्रामसभेची मान्यता | नोव्हेंबरपर्यंत |
| | तपशीलवार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता | डिसेंबरपर्यंत |
| | राज्यस्तरीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादरीकरण | जानेवारीपर्यंत |
| | राज्यस्तरीय तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | फेब्रुवारीपर्यंत |
| अंमल-बजावणी टप्पा | योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे | मार्चपर्यंत |
| | स्त्रोताचे खोदकाम पूर्ण करणे व सुरक्षित टप्प्यापर्यंत आणणे | पुढील आर्थिक वर्षाच्या जून-जुलैपर्यंत |
| | स्त्रोताचे काम पूर्ण करणे | पुढील आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबरपर्यंत |
| | उपांग-२ | पुढील आर्थिक वर्षाच्या मार्चपर्यंत |
| | उपांग-३ | त्यापुढील आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर |
| बहिर्गमन टप्पा | | त्यापुढील आर्थिक वर्षात जानेवारी ते मार्चपर्यंत |

एका विशिष्ट वर्षाच्या कृती आराखडयामध्ये समाविष्ट मान्य योजना, पुढील वर्षाच्या कृती आराखडयामध्ये आपोआप प्रगतीपथावरील योजना म्हणून समाविष्ट होतील व ही नियोजन प्रक्रिया निरंतर चालू राहील. वरील वेळापत्रकावरुन दिसून येईल की, योजनेच्या मागणीपासून बहिर्गमनापर्यंत

सर्वसाधारणपणे तीन वर्षाचा कमाल कालावधी लागतो. असे असले तरी योजना यापेक्षा कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य आहे.

१३. वरील मार्गदर्शक सूचना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. मात्र, ज्या ठिकाणी योजनांची कामे यापूर्वीच सुरु केली असून प्रगतीपथावर आहेत अशा योजना यापूर्वी निर्गमित केलेल्या धोरणाच्या आधारे पूर्ण केल्या जातील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००३१७१५३८२१००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(डॉ.निपुण विनायक)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

*प्रत,*

*मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,*
*मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव*
*विभागीय आयुक्त (सर्व)*
*सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,*
*सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद*
*महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई*
*उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर*
*सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती*
*नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई*
*वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
*ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई*
*मंत्रालयातील इतर सर्व विभाग,*
*पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने*
*निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७*

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीसाठी सुरु करण्यात आलेल्या **"जीवन संजीवनी"** योजनेस मुदतवाढ देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१८५/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २३ मार्च, २०१०**

वाचा : १) शासन निर्णय, पापुवस्वि. क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०२०/पापु-०७, दि.१५ जून,२००९

**प्रस्तावना:**

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत असलेल्या वीज देयकांच्या अदायगीसाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये **"जीवन संजीवनी"** योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेस मिळालेला चांगला प्रतिसाद तसेच विहित कालावधीत ज्या ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता आले नाही, अशा ग्राहकसंस्थांना या योजनेमध्ये सहभागी व्हावे यासाठी योजनेस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत असलेल्या वीज देयकांच्या अदायगीसाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आलेल्या **"जीवन संजीवनी"** योजनेस **दि.३१ ऑक्टोबर,२०१०** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

उपरोक्त मुदतवाढी व्यतिरिक्त योजनेमध्ये सहभागी होण्यासाठीच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल होणार नाही.

20 APR 2010

रॉटा/एच-३०३५[२०००-३-१०]-१ [कृ.मा.प.

F:\2010\GR-2010\CR 185 09 jeevan sanjivani extension GR 230310.doc

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००३२३१६४१४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मालिनी शंकर)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
विधान सभा सदस्य (सर्व )
विधान परिषद सदस्य (सर्व )
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
पालक सचिव (सर्व )
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व )
कार्यकारी अभियंता, ग्रा. पा. पु. विभाग,जिल्हा परिषद (सर्व )
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू.स. वि. यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

---

एच- ३०३५- १अ.
F:\2010\GR-2010\CR 185 09 jeevan sanjivani extension GR 230310.doc

उद्‌भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासून ३ कि.मी. पेक्षा जास्त होत असेल, किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार आहे, अशा योजनांमधील ३ कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरील पाईप लाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपिंग मशिनरी इत्यादी कामांसाठी येणा-या खर्चावर लोकवर्गणी माफ करण्यासाठी शासन स्तरावर समिती गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१४१/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १ जुलै, २०१०**

**वाचाः** शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापायो-१२०८/प्र.क्र.९६/पापु-०७, दि. १८ ऑगस्ट, २००८

**प्रस्तावना:**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये पाणी गुणवत्ता बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्‌भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावरील उद्‌भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी त्यांना योजनेची उद्‌भवापासून साठवण टाकीपर्यंतची पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपीग मशिनरी इ.वरील खर्चावरील लोकवर्गणी माफ करण्यासाठी शासन स्तरावर समिती गठित करण्यात आली आहे.

२. या समितीच्या समोर आलेल्या प्रस्तावांवरून शासनाच्या असे निदर्शनास आले की, ३ कि.मी. पेक्षा लांबीच्या उपांगासाठीच्या लोकवर्गणी मागणीबाबत पुरेशी स्पष्टता होत नव्हती, सबब यां संदर्भात स्वयंस्पष्ट सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून पाणी गुणवत्ती बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्‌भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर पेक्षा जास्त